मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ‘मुद्रांक शुल्का’च्या कामासाठी ‘पुणेवारी’ थांबणार...

## दस्त दुरुस्ती, परतावा आणि अपीलासाठी नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा वाढता विस्तार आणि मालमत्ता व्यवहारांची मोठी संख्या लक्षात घेता, शहरासाठी स्वतंत्र ‘सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी’ कार्यालय मंजूर करावे, अशी मागणी आमदार शंकर जगताप यांनी राज्य सरकारकडे केली आहे. याबाबत त्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटून लेखी निवेदन दिले. त्याला बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यामुळे दस्त नोंदणीनंतरच्या विविध कामांसाठी नागरिकांची पुण्यात होणारी पायपीट थांबणार असल्याचा विश्वास आमदार जगताप यांनी व्यक्त केला.



आमदार शंकर जगताप म्हणाले, पिंपरी-चिंचवड हे आशिया खंडातील झपाट्याने विकसित होणारे औद्योगिक आणि निवासी शहर आहे. शहरातून दरवर्षी मुद्रांक शुल्काच्या स्वरूपात सरकारला मोठा महसूल मिळतो. मात्र, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वरिष्ठ स्तरावरील कामांसाठी पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना आजही पुणे येथील मुद्रांक शुल्क विभागाच्या मुख्य कार्यालयावर अवलंबून राहावे लागते. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असून त्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

सध्या पिंपरी, चिंचवड, भोसरी, वाकड, थेरगाव, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, सांगवी, आकुर्डी आणि रावेत यांसारख्या प्रमुख निवासी व आयटी क्षेत्रातील नागरिकांना दस्त नोंदणीनंतरच्या मुद्रांक शुल्क परतावा, दस्त दुरुस्ती, अपील दाखल करणे यांसारख्या कामांसाठी पुण्यात जावे लागते. हवेली तालुक्यातील अनेक दुय्यम निबंधक कार्यालये पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत असली, तरी त्यांचे नियंत्रण पुणे शहरातून होते.

### ‘गुड गव्हर्नन्स’ संकल्पनेला बळ

**» “महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या अनेक क्रांतिकारक निर्णयांमुळे राज्यातील महसूल विभागात मोठी पारदर्शकता आली असून, याचा सर्वाधिक फायदा ग्रामीण भागातील सामान्य जनतेला झाला आहे. प्रशासकीय कामात सुटसुटीतपणा आणून लोकांचा वेळ वाचवणाऱ्या अनेक धोरणांमुळे खऱ्या अर्थाने सुशासनाची संकल्पना प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे.**

यामुळे प्रशासकीय प्रक्रियेत विलंब होतो. पिंपरी चिंचवडसाठी शहराचा वाढता विस्तार आणि मालमत्ता व्यवहारांच्या मोठ्या संख्येमुळे स्वतंत्र मुद्रांक शुल्क जिल्हाधिकारी कार्यालयाची गरज असून हे मंजूर झाल्यास दस्त नोंदणीनंतरच्या विविध कामांसाठी नागरिकांची पुण्यात होणारी पायपीट थांबणार आहे.

पिंपरी-चिंचवडच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय होणे ही काळाची गरज आहे.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना भेटून लेखी निवेदन दिले असून, त्यांच्याकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे दस्त नोंदणीनंतरच्या विविध कामांसाठी नागरिकांची पुण्यात होणारी पायपीट थांबणार असल्याचे आमदार शंकर जगताप म्हणाले.

# क्रीडा संकुल व सीबीएसएसी शाळा तातडीने उभारा

## नगरसेविका कविता भोंगाळे पाटील यांची महापालिकेत मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

औद्योगिकनगरीचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता, शहरातील युवा खेळाडूंच्या भविष्यासाठी पीपीपी (पी.पी.पी.) तत्त्वावर आधुनिक क्रीडा संकुल आणि 'सीबीएसई' संलग्न शाळा उभारण्याची आग्रही मागणी नगरसेविका कविता भोंगाळे पाटील यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली. आमदार महेश दादा लांडगे यांनी संकल्पना आणि दूरदृष्टीचा वारसा पुढे नेत हा प्रकल्प मार्गी लावणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



सभेसमोर आपले मत मांडताना कविता भोंगाळे पाटील म्हणाल्या की, पिंपरी-चिंचवड शहर वेगाने विकसित होत असले तरी, येथील खेळाडूंना आणि विद्यार्थ्यांना आजही जागतिक दर्जाच्या आधुनिक सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारामुळे शहरात क्रीडा संस्कृती रुजली असून अनेक मैदानांची उभारणी झाली आहे. याच विचाराला अधिक गती देण्यासाठी शहरात अत्याधुनिक इनडोअर हॉल, जिम्नॅशियम, ऑलिंपिक दर्जाचा स्विमिंग पूल आणि प्रशिक्षित मार्गदर्शक असलेले क्रीडा संकुल उभारणे आवश्यक आहे. हे संकुल केवळ एक इमारत नसून युवा खेळाडूंसाठी प्रगतीचे एक भव्य व्यासपीठ ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


क्रीडा सुविधांसोबतच गुणवत्तेच्या शिक्षणावर भर देताना त्यांनी सीबीएसई (CBSE) संलग्न शाळेची आवश्यकता अधोरेखित केली. डिजिटल क्लासरूम आणि नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतीमुळे महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी जागतिक स्तरावर सक्षमपणे उभे राहू शकतील, असे त्यांनी नमूद केले. हा संपूर्ण प्रकल्प 'पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप' (PPP) मॉडेलद्वारे राबविल्यास महापालिकेवरील आर्थिक ताण कमी होईल आणि खासगी भागीदारांच्या माध्यमातून प्रकल्पाचे संचलन व देखभाल अधिक प्रभावीपणे होईल, अशी सूचनाही त्यांनी केली. हा प्रकल्प केवळ पायाभूत सुविधांचा विषय नसून पुढच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली गुंतवणूक आहे, असे सांगत भोंगाळे यांनी या प्रस्तावावर तातडीने अंमलबजावणी करण्याची विनंती महापौर आणि आयुक्तांना केली. पिंपरी-चिंचवडचा खेळाडू ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकेल, हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ही पावले उचलणे अनिवार्य असल्याचे त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

# आयुक्त गतिमान प्रशासनातून शहराचा विकास साधतील : महापौर रवि लांडगे

## नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना विशेष सर्वसाधारण सभेमध्ये शुभेच्छा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची आज अर्थसंकल्पीय विशेष सभा आयोजित करण्यात आली होती. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नव्याने रूजू झालेले डॉ. विजय सूर्यवंशी यांची ही पहिलीच सर्वसाधारण सभा असल्याने त्यांचा सभागृहाला परिचय करून देण्यात आला. पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त म्हणून यशस्वी कामकाज करण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी त्यांना पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी गतिमान प्रशासनातून पिंपरी चिंचवड शहराचा विकास साधतील, असा विश्वास महापौर रवि लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला.



पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या या विशेष सभेला उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर तसेच नगरसदस्य, नगरसदस्या, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विशेष सभेत सुरुवातीला आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांचा परिचय करून देण्यात आला. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे शालेय शिक्षण जि. प. शाळा, देवळा तसेच सैनिक स्कूल, सातारा येथे पूर्ण केले आहे. ते २००६ बॅचचे भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) अधिकारी असून त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम करत प्रशासनात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी यापूर्वी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ येथे सह मुख्य कार्यकारी अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), जिल्हा परिषद कोल्हापूर व पालघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोंदिया व रायगड येथे जिल्हाधिकारी, तसेच भारताचे संरक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव म्हणूनही जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय त्यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त, मुंबई येथे अतिरिक्त महानगर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त तसेच कोकण विभागाचे विभागीय आयुक्त अशी महत्त्वाची पदे भूषविली आहेत, अशी माहिती परिचयामध्ये देण्यात आली.

तसेच आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना प्रशासकीय काळात मिळालेले पुरस्कार आणि त्यांनी केलेली विशेष कामगिरी याबाबत देखील सविस्तर माहिती देण्यात आली. प्रास्ताविक महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले.

### आयुक्त यांना मिळालेले पुरस्कार

» मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे कार्यरत असताना, सन २०१५ मध्ये राज्यस्तरीय यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार, तसेच देशपातळीवरील रु. २५ लाखांचा पुरस्कार प्राप्त.

» कोल्हापूर येथे कार्यरत असताना, प्राथमिक आरोग्य केंद्राचा सुधार करण्यासाठी "कायापालट अभियान" प्रथमच सुरुवात केली, जी आता राष्ट्रीय पातळीवर कायाकल्प पुरस्कार म्हणून राबविली जात आहे.

» रायगड जिल्हाधिकारी असताना रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी केलेल्या प्रयत्नास राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक.

» जिल्हाधिकारी गोंदिया असताना, नरेगाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उत्कृष्ट श्रेणीचा पुरस्कार.

» मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्मार्ट सिटी-२०२० अंतर्गत गृहनिर्माण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेमध्ये कल्याण-डोंबिवली महापालिकेला कोविड इनोव्हेशन पुरस्कार.

» स्मार्ट सिटी मिशन, गृहनिर्माण मंत्रालय, भारत सरकार यांनी आयोजित केलेल्या फ्रिडम-टू-वॉक व सायकल स्पर्धेमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नागरिकांनी उत्कृष्ट आरोग्यासाठी भाग घेतला, त्यात देशात प्रथम क्रमांक मिळवला.

» कल्याण-डोंबिवली महापालिकेत कार्यरत असताना एम.ई.डी.ए. यांनी आयोजित केलेल्या १६ व्या राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन स्पर्धेमध्ये "महापालिका इमारती व रुग्णालयामध्ये ऊर्जा संवर्धन, स्ट्रीट लाईट, पाणीपुरवठा व जलनिस्सारण" पुरस्कार प्राप्त.

» महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात क्षेत्रीय कार्यालयांमध्ये विभागीय आयुक्त, कोकण विभाग कार्यालयाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त.

# मोशीतील 470 विद्यार्थ्यांना मिळाले हक्काचे 'ज्ञानमंदीर'

## सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलचा प्रश्न सुटला; महापालिका प्रशासनाकडून वर्ग खोल्या केल्या उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथे शिवाजीवाडी-डुडुळगाव परिसरातील सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचा गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला वर्गखोल्यांचा प्रश्न अखेर सुटला असून, तब्बल ४७० विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी हक्काच्या वर्गखोल्या उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, ही समाविष्ट गावांतील पहिली 'सीबीएसई' आणि इंग्रजी माध्यमाची शाळा आहे.





या शाळेसाठी २०१७ पासून महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू होता. मात्र, २०२० ते २०२३ या कालावधीत वर्गखोल्यांच्या अभावामुळे एकाही विद्यार्थ्याला प्रवेश देता आला नव्हता. सध्या सुमारे १२५० विद्यार्थी वर्गखोल्यांच्या कमतरतेमुळे प्रवेशापासून वंचित होते. ज्या ठिकाणी एका वर्गात ४० मुले आणि ४० मुली असा प्रवेश दिला जातो, त्या ठिकाणी वर्गखोल्या नसल्यामुळे केवळ २०-२० विद्यार्थ्यांनाच प्रवेश द्यावा लागत होता.

या गंभीर समस्येकडे भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी लक्ष वेधून सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येत महापालिका भूमि जिंदगी विभागाकडून शाळेसाठी आवश्यक वर्गखोल्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्या शिक्षण विभागाला हस्तांतरित केल्या आहेत. महापालिका प्रशासनाकडून या ठिकाणी एका शैक्षणिक संकुलाचे काम सुरू आहे. त्यामधील एका भागात ही शाळा सुरू होईल. त्या ठिकाणी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील, याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. पालकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे मोशी परिसरातील शिक्षण व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळण्यास मदत होणार आहे.

> "मोशी परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, हीच आमची प्राथमिकता आहे. सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलमधील वर्गखोल्यांचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. याबाबत सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर महापालिका प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतला आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या. पुढील काळातही परिसरातील शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पुणे महापालिकेचा 5 हजार कोटी उत्पन्नवाढीचा आराखडा

## 1 एप्रिलपासून अंमलबजावणी; ओव्हरहेड केबल्स, कर धोरण व दंडातून महसूल वाढीचा दावा

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ करण्यासाठी प्रशासनाने व्यापक उपाययोजना आखल्या आहे. येत्या 1 एप्रिलपासून त्यांची अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे. विविध स्रोतांद्वारे सुमारे 5 हजार कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचा दावा स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी पत्रकार परिषदेत केला.

महापालिकेचे तब्बल 15 हजार 699 कोटी रुपयांचा महापालिकेचा अर्थसंकल्प स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सोमवारी सादर केला. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. भिमाले यांनी महापालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी विविध उपाय योजना करण्यात येणार असल्याचे सांगितले. भिमाले म्हणाले, शहरातील सुमारे 3,600 किलोमीटर लांबीच्या बेकायदा ओव्हरहेड केबल्स हटवून त्या अंडरग्राऊंड करण्याची मोहीम राबवण्यात येणार आहे. या प्रक्रियेतून सुमारे 1,400 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.



### कर धोरण व दंडात्मक कारवाई

» महापालिकेने नव्या कर धोरणातून सुमारे ७०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याशिवाय बेकायदा बांधकामांवर कठोर कारवाई करून सुमारे ४०० कोटी रुपयांची वसुली होण्याची अपेक्षा आहे. थकबाकीदारांकडून वसुली आणि नोंदणीबाह्य मिळकती शोधून कर आकारणी केल्यास महसूलात आणखी वाढ होणार आहे.

या सोबतच समाविष्ट गावांमधील बांधकाम परवानग्यांमधून सुमारे 1 हजार कोटी, नव्या कर धोरणातून 700 कोटी, बेकायदा बांधकामांवरील दंडात्मक कारवाईतून 400 कोटी, तर शासन व शैक्षणिक संस्थांकडील थकबाकीतून 140 कोटी रुपयांची वसुली अपेक्षित आहे. नोंदणीबाह्य मिळकती शोधून त्यांच्यावर कर आकारणी केल्यास आणखी 340 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

महापालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी अमेनिटी स्पेसचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. उपलब्ध 950 ॲमेनिटी स्पेसपैकी 164 जागा भाडे तत्त्वावर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच राज्य शासनाकडून विविध योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधी अपेक्षित आहे. उड्डाणपुलांसाठी 500 कोटी, अग्निशामक दलासाठी 350 कोटी, तसेच अमृत 2 आणि एनडीएमए योजनांतर्गत आणखी 350 कोटी रुपयांचे अनुदान मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, महापालिकेच्या उत्पन्नाच्या बाबतीत राज्य शासनावर मोठ्या प्रमाणात अवलंबित्व असल्याचेही स्पष्ट झाले आहे. समाविष्ट गावांतील कररचना, थकबाकी आणि प्रलंबित प्रश्नांमुळे महसूलवाढीला अडथळे येत असल्याची कबुलीही देण्यात आली.

### केबल्स व परवानग्यांमधून महसूल

» महापालिकेने उत्पन्न वाढीसाठी बेकायदा ओव्हरहेड केबल्स हटवून त्या अंडरग्राउंड करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या प्रक्रियेतून सुमारे १,४०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच समाविष्ट गावांमधील बांधकाम परवानग्यांमधून सुमारे १ हजार कोटी रुपये मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या उपाययोजनांमुळे महसूल वाढीस चालना मिळणार आहे.

### ॲमेनिटी स्पेस व शासन निधी

» उपलब्ध ॲमेनिटी स्पेसपैकी १६४ जागा भाडेतत्त्वावर विकसित करून उत्पन्न वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच राज्य शासनाकडून उड्डाणपूल, अग्निशामक दल आणि विविध योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधी अपेक्षित आहे. या सर्व उपाययोजनांमुळे महापालिकेची आर्थिक स्थिती मजबूत होण्यास मदत होणार आहे.

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पुण्यात होणार नवीन बोगदे, उड्डाणपूल भुयारीमार्ग

## 54 किमी भुयारी मार्गांची योजना; येरवडा–कात्रज ट्विन टनेलला प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात उड्डाणपूल, भुयारीमार्ग, बोगदे प्रस्तावित करण्यात आले आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सुमारे ५४ किलोमीटर लांबीचे भुयारी रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात येरवडा ते कात्रज हा १४.५ किलोमीटर लांबीचा ट्विन टनेल बांधण्यात येणार आहेत.

शनिवारवाडा ते स्वारगेट या भुयारी मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम हाती घेण्यात येणार आहे. शहराच्या विकास आराखड्यातील चार बोगद्यांपैकी दोन बोगद्यांचे काम प्राधान्यक्रमाने केले जाणार आहे. त्यामध्ये कोथरूड-पाषाण आणि हिंगणे-धनकवडी या दोन बोगद्यांच्या कामांचा समावेश आहे. त्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत असून, लवकरच हे काम सुरू होणार आहे.



घोरपडी रेल्वे पूल, आगाखान पॅलेस येथील नदीवरील पूल, सनसिटी-कर्वेनगर नदीवरील पूल, साधू वासवानी पूल आणि विश्रांतवाडी उड्डाणपूल हे प्रकल्प लवकरच पूर्ण होणे अपेक्षित आहेत. शास्त्रीनगर उड्डाणपूल, बिंदूमाधव ठाकरे चौक उड्डाणपूल, सेनापती बापट चौक उड्डाणपूल पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मुंढवा-खराडी उड्डाणपूल, शिवणे-नांदेड सिटीला जोडणारा पूल, चांदणी चौक ते भूगाव उड्डाणपूल, साखर संकुल येथील गणेशखिंड रस्त्यावरील भाऊसाहेब खुडे चौक ते नेताजी सुभाषचंद्र बोस चौकादरम्यान उड्डाणपूल, खडकी छावणी हद्दीतील रेल्वे भुयारी मार्गाचे रुंदीकरण हे प्रकल्प उभारण्याचे नियोजन असल्याचे अर्थसंकल्पात स्पष्ट करण्यात आले आहे. मार्केटयार्ड बस डेपो ते वर्धन चौकादरम्यान उड्डाणपुलाचे (गंगाधाम चौक) लवकरच सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर काम सुरू केले जाणार आहे.

### 'पीपीपी' तत्त्वावर बहुमजली वाहनतळ

» शहराच्या विकास आराखड्यात पार्किंगसाठी आरक्षित जागांवर 'पीपीपी' तत्त्वावर वाहनतळ सेवा सुरू करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. अस्तित्वातील वाहनतळ हे बहुमजली करण्याचे नियोजित आहे. आवश्यकतेनुसार ते 'पीपीपी' तत्त्वावर विकसित केले जाणार आहेत. पार्किंग वॉर्डन नियुक्त करणे, पार्किंग व्यवस्थापन प्रभावी करण्यासाठी आरक्षणांचे 'जीआयएस' मॅपिंग करण्यात येणार आहे.

# पुण्यात महिलांना मिळणार करामध्ये सवलत

## 50% मिळकत करमाफी, स्वसंरक्षण प्रशिक्षण आणि उद्योजकतेसाठी नवे उपक्रम

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या अर्थसंकल्पात 'सशक्त महिला-सक्षम समाज' या संकल्पनेवर भर देताना महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार आहेत. यामध्ये महिलांच्या नावावरील मिळकतींना ५० टक्के मिळकत करमाफी, महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन सेंटर, शाळेतील मुलींसाठी 'पिंक रुम' तसेच महिलांना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी प्रशिक्षण योजना राबविल्या जाणार आहेत.

महिलांच्या नावावरील मिळकतींना ५० टक्के मिळकत करमाफी देण्याच्या योजनेमुळे महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणी वाढण्यास चालना मिळणार आहे. तसेच, महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन सेंटर उभारण्यात येणार असून येथे महिला उद्योजक, बचत गट आणि विविध क्षेत्रातील महिलांसाठी प्रशिक्षण, कार्यशाळा, प्रदर्शन आणि संवाद कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



### सुरक्षितता व विकासासाठी उपक्रम

» महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार असून, ज्युदो, कराटे, लाठी-काठी यांचे प्रशिक्षण दिले जाईल. तसेच शाळांमध्ये 'पिंक रुम'ची सुविधा उपलब्ध करून मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण केले जाणार आहे. याशिवाय महिला उद्योजकांसाठी स्वतंत्र कन्व्हेन्शन सेंटर उभारून प्रशिक्षण, कार्यशाळा आणि प्रदर्शनांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजनेची पुनर्रचना करण्यात येणार आहे. यामध्ये कौटुंबिक सल्ला, कायदेशीर मार्गदर्शन आणि समुपदेशन सेवा देण्यात येणार आहेत. तसेच महिलांमध्ये आत्मविश्वास आणि सुरक्षिततेची भावना वाढीस लागावी यासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण केंद्र सुरू करून ज्युदो, कराटे, लाठी-काठी, योगासने यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. बचत गटांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कौशल्य विकास, उद्योजकता प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी आणि कायमस्वरुपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे.

व्यवसाय प्रशिक्षण, दहावी-बारावीतील विद्यार्थिनींसाठी खासगी शिकवण्या, सीईटी परीक्षेसाठी अर्थसाह्य, कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी अनुदान, मुलगी दत्तक योजना, रमाई स्वावलंबन योजना, संजय गांधी निराधार योजना आणि इंदिरा गांधी विधवा निवृत्तीवेतन योजना यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

पुणे महापालिका हद्दीतील महिलांच्या सक्षमीकरणासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात विविध योजनांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकातील महिला वर्गांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी सांगितले.

### आर्थिक सक्षमीकरणावर भर

» महापालिकेच्या अर्थसंकल्पात महिलांच्या नावावरील मिळकतींना ५० टक्के करमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेमुळे महिलांच्या नावावर मालमत्ता नोंदणी वाढण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच बचत गटांमार्फत महिलांना कौशल्य विकास, उद्योजकता प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होऊन त्या स्वावलंबी बनण्यास मदत होईल.

### डिजिटल समुपदेशन आणि मार्गदर्शन

» किशोरवयीन मुलींच्या आरोग्य आणि मानसिक सक्षमीकरणासाठी महापालिकेच्या ७५ शाळांमध्ये 'तीची हक्काची जागा' या संकल्पनेअंतर्गत 'पिंक रुम' विकसित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून डिजिटल समुपदेशन आणि मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध होणार आहे. महिलांच्या सुरक्षितता आणि सन्मानाच्या दृष्टीने शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी १०० अद्ययावत आणि स्वच्छ सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी केली जाणार आहे.

# वीजबिल आता 'व्हॉट्सॲप'वर; वाढीव बिलाच्या तक्रारीही चुटकीसरशी सुटणार

## दैनंदिन धावपळीतही महावितरणच्या सेवा मिळाव्यात म्हणून 'व्हॉट्सॲपवर' सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

वीज ग्राहकांना अधिक जलद आणि दैनंदिन धावपळीतही महावितरणच्य सेवा मिळाव्यात म्हणून 'व्हॉट्सॲपवर' सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वीजबिल पाहण्यापासून वीजबिल भरण्यापर्यंत सर्व सुविधा एकाच ठिकाणी ग्राहकाला उपलब्ध झाल्या आहेत. राज्यातील सर्व वीजग्राहकांनी या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यात महावितरणचे ३ कोटी १२ लाखांहून अधिक वीजग्राहक आहेत. तर पुणे परिमंडलात



ग्राहकांची संख्या ३९ लाखांच्या घरात आहे. या सर्व ग्राहकांना १३ मार्चपासून महावितरणच्या व्हॉट्सॲप सेवेचा लाभ मिळणार आहे. पूर्वी दरमहिन्याला येणारे वीजबिल आणि ते भरल्याची पावती घराघरांत फाईलिंग करुन जतन केली जात होती. मात्र, गेल्या काही वर्षांपासून महावितरणने मोबाईल ॲपसह संकेतस्थळावर विविध सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून दिल्या. आता या सर्व सेवा वीजग्राहकांना व्हॉट्सॲपवर उपलब्ध झाल्याने लाखो ग्राहकांना लाभ होत असल्याचा दावा महावितरणकडून करण्यात आला.

### व्हॉट्सॲपवर उपलब्ध सेवा

» वीज बिल आणि पेमेंट : ग्राहक आपले चालू वीज बिल पाहू शकतात आणि तिथूनच थेट बिलाचा भरणाही करू शकतात. त्याकरिता डेबिट कार्ड, युपीआय आदींचे पर्याय विचारले जातात.

» ई-बिल आणि पावती : व्हॉट्सॲपवरून डिजिटल बिल (e-bill) डाऊनलोड करण्याची सोय असून, बिल भरल्यानंतर त्याची पावतीही तात्काळ मिळवता येणार आहे.

» तक्रार नोंदणी : वीज पुरवठा खंडित होणे किंवा विजबिलांबाबत तसेच इतर तांत्रिक समस्यांबाबतची तक्रार आता व्हॉट्सॲपवर नोंदवता येणार आहे. त्या तक्रारींची सद्यस्थितीही व्हॉट्सॲपवर तपासता येणार आहे.

» नवीन जोडणी अर्जाचा मागोवा: नवीन वीज जोडणीसाठी केलेल्या ऑनलाईन अर्जाची सद्यस्थिती काय आहे, हे ग्राहकांना घरबसल्या समजेल.

» गो-ग्रीन सुविधा : पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कागदी बिलाऐवजी ई-बिल घेण्याच्या 'गो-ग्रीन' योजनेत ग्राहक व्हॉट्सॲपच्या माध्यमातून सहभागी होऊ शकतात किंवा बाहेर पडू शकतात.